**आकाशवाणी नागपूर,**

**(मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक ०७ जानेवारी २०२५**

**ठळक बातम्या**

- **एचएमपीव्ही संसर्गाबाबात जनतेने घाबरुन जाऊ नये. राज्य सरकारं आणि केंद्रशासित प्रदेश प्रशासनांनी श्वसनरोगांसाठी व्यवस्थापनाची फळी मजबूत करावी असं केंद्रसरकारचं आवाहन, राज्य सरकार परिस्थितीवर लक्ष ठेवून - हसन मुश्रीफ यांची माहिती.**
- **नागपुरात एचएमपीव्हीचे रुग्ण नसल्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण, संशयितांच्या अहवालाची प्रतीक्षा.**
- **राज्यातील चार चाकी वाहन धारकांना एक एप्रिल पासून फास्ट टॅग अनिवार्य.**
- **गोंदियातील नवेगाव बांध पर्यटक निवास पर्यटकांसाठी पर्वणी ठरतील: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अपेक्षा, पर्यटक निवासाचे लोकार्पण.**

एचएमपीव्ही-राष्ट्रीय

ह्युमन मेटान्यूमो वायरस अर्थात एच.एम.पी.व्ही विषाणूमुळे जनतेनं घाबरून जाऊ नये, असं केंद्रीय आरोग्य सचिव पुण्य सलीला श्रीवास्तव यांनी म्हटलं आहे. राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांबरोबर दृकश्राव्य माध्यमातून घेतलेल्या बैठकीत त्यांनी देशातील श्वसनाच्या आजारांची सद्यस्थिती, त्याचं व्यवस्थापन तसंच HMPV संसर्गाच्या प्रकरणांचा आढावा घेतला. राज्यांनी इन्फ्लूएंझा आणि गंभीर स्वरूपाच्या श्वसनरोगांच्या व्यवस्थापनाची फळी मजबूत करावी, असे निर्देश त्यांनी दिले. राज्यांना माहिती, शिक्षण आणि संवाद, तसंच विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी जनतेमध्ये जागरूकता वाढवावी, अशी सूचना त्यांनी केली. श्वसनाशी संबंधित आजाराची वाढती प्रकरणं हाताळण्यासाठी देश सज्ज असल्याचं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं. दरम्यान, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जेपी नड्डा यांनी आकडेवारीचा दाखला देत या विषाणूच्या संसर्गावर सरकार लक्ष ठेऊन असल्याचे म्हटले आहे.

***On recent reports, the cases of HMPV in China, the Health Ministry, the Indian Council for Medical Research and the National Center for Disease Control are keeping a close watch on the situation in China as well as in their neighboring countries. WHO has taken cognizance of the situation and will share their report shortly with us. The country data for respiratory viruses available with Indian Council for Medical Research (ICMR) and the Integrated Disease Surveillance Program has also been reviewed and no surge in any of the common respiratory viral pathogens is observed in India.***

भारतात एच.एम.पी.व्ही म्हणजेच ह्युमन मेटान्यूमोव्हायरसनं बाधित आणखी दोन रुग्ण आढळून आले असले, तरी काळजी करण्यासारखी परिस्थिती नसल्याचं जागतिक आरोग्य संघटनेच्या माजी शास्त्रज्ञ डॉ.सौम्या स्वामिनाथन यांनी म्हटलं आहे. हा विषाणू नवीन नाही, तसंच त्यामुळे सौम्य स्वरूपाचा संसर्ग होतो, असं त्यांनी समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. २००१ साली एच.एम.पी.व्ही या विषाणूचा शोध लागला. खोकला, ताप, सर्दी आणि धाप लागणे, ही या विषाणूच्या संसर्गाची लक्षणं आहेत.

एचएमपीव्ही हसन मुश्रीफ राज्य- पत्र परिषद

जगातील अनेक देशांमध्ये एचएमपीव्ही विषाणूचा प्रभाव दिसून येत आहे. आपल्या देशात आजपर्यंत एकूण पाच रुग्ण कर्नाटक, तामिळनाडू आणि गुजरात या राज्यात आढळून आले. त्यापैकी एक रुग्ण पूर्णपणे बरा होवून घरी गेलेला आहे. उर्वरित रुग्ण बरे होत आहेत. हा आजार गंभीर नसून लहान मुलं, वृद्ध आणि इतर गंभीर आजार असणाऱ्यांनी काळजी घ्यावी, असे आवाहन राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी केलं. मंत्रालयीन दालनात एचएमपीव्ही विषाणू संदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते. रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांपासून संसर्गाबाबत बोलताना ते म्हणाले की..

***सार्वजनिक आरोग्य विभाग नियमितपणाने याबद्दलच पत्रक काढेल, वैद्यकीय विभागाच्या संदर्भात आणखी आमचे जिथे जिथे शासकीय महाविद्यालये आहेत तिथे फार मोठे हॉस्पिटल आहेत आणि रुग्णाची फार मोठी गर्दी आहे. त्यामध्ये फार मोठी दक्षता घेण्याची आवश्यकता आहे. हा जर संसर्गजन्य असेल तर अनेकांना खोकला सर्दी असे जे आजार असतील त्याला थोडस विलगीकरण***

***करणार आणि हा इतर नागरिकांमध्ये पसरणार नाही याची काळजी घ्यायची आवशक्यता आहे.***

आपल्या राज्यातील नागरिकांनी घाबरून जाऊ नये कारण सरकार लवकरच या परिस्थितीबद्दल सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्त्वे जारी करून या रोगाला प्रतिबंधात्मक उपाययोजना करून आळा घालण्यात येईल, असंही मुश्रीफ यांनी सांगितले.

एचएमपीव्ही-नागपूर

महाराष्ट्रात नागपूरमध्ये एचएमपीव्ही विषाणूचा संसर्ग झाल्याचा केवळ संशय असल्याचं नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी आज प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं. संशयित नमुने आयसीएमआर आणि एनआयव्हीकडे पाठवले असून, त्याचा अहवाल आल्यावर योग्य उपाययोजना केल्या जातील, असं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

***आज जे मीडिया मध्ये चालत आहे की, नागपूरमध्ये दोन ह्युमन मेटान्युमोव्हायरसचे पेशंट आढळले आहेत. ते सध्या चुकीचे आहे दोन पेशंटस जे एक सात वर्षाच आणि चौदा वर्षाचे होते ते वॉकिंग ओपीडी मध्ये त्यांनी आपली पॅनल टेस्ट केली त्याच्यामध्ये सस्पेक्टेड जे आलेले आहेत, पण जोपर्यंत आम्ही एनआयव्ही आणि एम्स मधून तपासणी होणार नाही तोपर्यंत त्याच्यामध्ये कसलही बोलण बरोबर नाही आहे कारण सध्या नागपूरमध्ये एकही केस नाही सस्पेक्टेड आहे. आता आम्ही त्यांच सॅम्पल जो आहे तो एम्सला आणि पुण्याला पाठवू आणि त्याच्यानंतर आपल्याला कळेल तो पॉसिटीव्ह आहे की निगेटिव्ह आहे.***

नागपूरमध्ये दोन लहान मुलांमध्ये एचएमपीव्ही संसर्गाची लक्षणं आढळून आल्याचं वृत्त प्रसारित झालं होतं, त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी हा खुलासा केला.

फास्ट टॅग

राज्यातील चारचाकी वाहनधारकांना एक एप्रिल पासून फास्ट टॅग अनिवार्य करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेतल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. १ एप्रिल 2025 पासून या निर्णयाची अंमलबजावणी

होईल.  या निर्णयामुळे वाहतूक कोंडी टळून इंधनाची आणि वेळेची देखील बचत होणार आहे. फास्ट टॅग कार्यरत नसेल तर वाहन धारकाला पथकर शुल्काच्या दुप्पट शुल्क भरावे लागेल.  त्याचप्रमाणे रोख रक्कम स्मार्ट कार्ड, क्रेडिट डेबिट कार्ड किंवा कोड किंवा इतर कोणत्याही माध्यमाद्वारे पथकर शुल्क भरायचे असेल तरी देखील दुप्पट पथकर शुल्क भरावे लागेल एमएसआरडीसीच्या अखत्यारीत ५० टोलनाके असून सार्वजनिक बांधकाम विभागाचे राज्यात २३ टोल नाके आहेत. या नाक्यांवर या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल, अशी माहितीही उपमुख्यमंत्र्यांनी दिली.

नवेगावबांध

विदर्भातील गोंदिया जिल्ह्यामधे एमटिडीसीचे नवेगाव बांध पर्यटक निवास नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या भोवती शाश्वतरित्या उभारलेले असून ते पर्यटकांसाठी पर्वणी ठरेल, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. मंत्रालय इथल्या  मंत्रिमंडळ बैठकीनंतर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा नवेगाव बांध  पर्यटक निवास लोकार्पण सोहळा आभासी पद्धतीने पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. नवेगावबांध  या पर्यटन स्थळी पर्यटकांना राहण्याकरिता महामंडळाने प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतून  21 कोटी रुपयांच्या निधीतून उत्तम सुविधेने सज्ज असलेले पर्यटक निवास चांदपूर या नावाने सुरू केलेले आहेत.  येथे VIP सूट, डीलक्स सूट, स्टँडर्ड सूट आणि 8 बेडेड डॉर्मिटरी, उपहारगृह आणि मनोरंजनासाठी स्विमींगपूल इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत. नवेगाव बांध पर्यटकांचे आकर्षण  केंद्र असून इटियाडोह धरण हे गोंदिया, भंडारा आणि गडचिरोली जिल्ह्यांसाठी असलेला हा पाटबंधारे प्रकल्प मोरगांव अर्जुनी तालुक्यात आहे.

किमान आधारभूत किंमत

शेतमालाची किमान आधारभूत किंमत-एमएसपी पेक्षा कमी दरानं खरेदी होणार नाही, याची खबरदारी घेण्याच्या सूचना, राज्याचे कृषी आयुक्त रावसाहेब भागडे यांनी कृषी पणन मंडळाला दिल्या आहेत. शेतमालाची एमएसपीपेक्षा कमी दराने खरेदी झाली तर शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांना संपर्क करण्याचं आवाहन त्यांनी केलं. शेतमालाच्या बाजार व्यवस्थापनाचं अचूक

नियोजन करण्यासाठीच्या राज्यस्तरीय समन्वय समितीच्या बैठकीत ते पुण्यात बोलत होते.

बावनकुळे पत्र परिषद

भारतीय जनता पक्षाच्या संघटन पर्वाला एक जानेवारीपासून सुरुवात झाली आहे. याच संघटन पर्वाचा दुसरा ड्राईव्ह येत्या दहा तारखेला 'घर चलो अभियान' या माध्यमातून घेण्यात येणार असून प्रत्येक घरी जाऊन प्राथमिक सदस्यता नोंदणी करण्यात येणार आहे, अशी माहिती भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज मुंबईमध्ये पत्रकार परिषदेत दिली. यावेळी माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांची उपस्थिती होती.

वाघिणीची शिकार

भंडारा जिल्ह्याच्या तुमसर वनपरिक्षेत्र अंतर्गत येत असलेल्या झंझेरिया बिट मधील तीन पुलिया तलावाजवळ एका तीन वर्षीय पट्टेदार वाघिणीची शिकार करून जंगलात फेकल्याची धक्कादायक घटना समोर आली. दोन-तीन दिवसांपूर्वी शिकाऱ्याने विद्युत प्रवाह सोडून ही शिकार केल्याचे समजते. घटनेची माहिती मिळताच नागपूर, भंडारा, तुमसर इथले पशुवैद्यकीय अधिकारी आणि वन - अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.

विजयंता

सन १९७१मध्ये पाकिस्तानसोबत झालेल्या युद्धात महत्त्वाची कामगिरी बजावणाऱ्या 'विजयंता' या रणगाड्याची चंद्रपूर जिल्ह्यातल्या भद्रावती इथल्या आयुध निर्माणी 'चांदा'च्या मुख्य प्रवेशद्वारासमोर आज स्थापना करण्यात आली. सेवानिवृत्तीनंतर विजयंता रणगाडा पुणे इथं आयुध निर्माणीतील आगारात ठेवण्यात आला होता. विजयंता रणगाडा या युद्धातील विजयाची साक्ष म्हणून, नव्या पिढीला प्रेरणा देत राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

*****